लोकमत

# ७५० विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठाची प्रवेश परीक्षा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा सुरू आहे. त्यात सोमवारी एम.एस्सी. अभ्यासक्रमातील पाच विषयांच्या परीक्षेसाठी एकूण ९८८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७५० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २३८ जण गैरहजर राहिले. एम.एस्सी. बायोकेमिस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटच्या ३९७ विद्यार्थ्यांनी, पर्यावरणशास्त्र विषयाच्या ८९ आणि फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या २६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ओएमआर पद्धतीने विद्यापीठातील विविध अकरा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येत असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

लोकमत

# एम. फिल., प्री-पीएच.डी. परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उन्हाळी सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या एम. फिल., प्री-पीएच.डी. अभ्यासक्रम (कोर्स वर्क) परीक्षा शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये होणार आहेत. त्याचे स्वरूप ऑफलाईन वर्णनात्मक असणार आहे. बी. कॉम., बीबीए., बीसीए, आदी अभ्यासक्रमांच्या पुर्नपरीक्षा गुरुवार (दि. १६) पासून होणार आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सूचनेनुसार एम. फिल., प्री-पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा प्रचलित वर्णनात्मक ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन करत अधिविभाग आणि महाविद्यालयांनी परीक्षांचे आयोजन करावे, अशी सूचना विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केली आहे. दरम्यान, काही विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणास्तव उन्हाळी सत्रातील परीक्षा देता आलेली नाही. अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यापीठाने त्यांची पुनर्परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक परीक्षा मंडळाने संकेतस्थळावर प्रसिद्ध आहे.

पुढारी

# विद्यापीठातर्फे १६, २१ सप्टेंबरला पुनर्परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्र परीक्षा तांत्रिक अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी आणि पदव्युत्तरच्या पुनर्परीक्षा १६ व २१ सप्टेंबर रोजी होणार आहेत. याबाबतचे परिपत्रक सोमवारी काढले आहे.

परीक्षेसाठी ८ हजार ८०० विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. बी.कॉम, बीबीए, बीसीए, बी.एस्सी., बी.टेक, बीएसडब्ल्यू., बी.व्होक, बीओडी, बीआयडी, बीडीएस अभ्यासक्रमाची परीक्षा १६ सप्टेंबर रोजी होईल. बी.ए., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.एस. डब्ल्यू. एमसीएची पुनर्परीक्षा २१ सप्टेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठाच्या पदव्युतर अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेला ७५० विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सोमवारी पदव्युतर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली. ९८८ पैकी ७५० विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. शिवाजी विद्यापीठातील विविध विभाग, संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ प्रवेशाची पदव्युत्तर प्रवेश परीक्षेचे कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव येथील ११ परीक्षा केंद्रांवर आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी ही परीक्षा तीन सत्रांत घेण्यात आली.